बीड । शुक्रवार
२८.०२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३२१
किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 



# संतोष देशमुख हत्या प्रकरण ; आरोपी सुटणे अशक्य!

## सीआयडीच्या १५०० पानांच्या दोषारोप पत्रात काय?

**बीड । प्रतिनिधी**

संतोष देशमुख हत्या प्रकरणी, जवळपास दीड हजार पानांचं आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आलं आहे. पवनचक्की खंडणी प्रकरण आणि अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणातही दोषारोपपत्र दाखल झालं. यावेळी सीआयडीचे अतिरिक्त महासंचालक बसवराज तेली आणि एसआयटीचे प्रमुख किरण पाटील न्यायालयात उपस्थित होते. आता सरपंच हत्येचा खटला कोर्टात चालणार असून, विशेष सरकारी वकील उज्वल निकम हे हा खटला लढवणार आहेत.

### काय आहे आरोपपत्रात?

– वाल्मिक कराडचा संतोष देशमुख हत्या प्रकरणातला सहभाग आणि त्याचे पुरावे.

– सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करणारे सात आरोपींनी कशाप्रकारे हात त्याचा कट रचला आणि हत्या केली याचे पुरावे.

– या हत्याकांडामध्ये कुणाकुणाचा सहभाग आहे याचा तपास.

– संतोष देशमुख यांच्या हत्येचा मूळ कारण समोर येणार.

– खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे यांचा संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सहभाग आहे का याचाच तपास समोर येणार.

– खंडणी प्रकरण त्यानंतर ट्रॉसिटी प्रकरण आणि त्यानंतर हत्या प्रकरण या तिन्ही प्रकरणाचा एकमेकाशी काही संबंध आहे का याचे पुरावे.

– या प्रकरणातील आरोपींना फरार होण्यात कोणी सहकार्य केले आरोपी फरार झाल्यानंतर कुठे होते काय केले यासंदर्भातील ही सत्य दोषारोप पत्रातून समोर येणार.

– सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करताना आरोपींनी वापरलेले शस्त्र आणि हत्या नेमकी कशा पद्धतीने झाली याचेही सत्य समोर येणार.

– संतोष देशमुख हत्या प्रकरणात पोलिस प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केली का आणि दोषी आहेत का याचेही सत्य सीआयडीच्या तपासातून समोर येणार.

– या प्रकरणाशी संबंधित असलेल्या कुणाकुणाची चौकशी झाली हे देखील दोषारोप पत्र मधून समोर येणार.

– वाल्मिक कराडने खंडणी प्रकरणातून जमा केलेल्या संपत्ती संदर्भातील माहिती देखील समोर येण्याची शक्यता.

– वाल्मिक कराड, सुदर्शन घुले यांच्या संघटित गुन्हेगारीचे आणखी काही प्रकार घडले होते का? तसेच आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी यासंदर्भातही आरोप पत्रात सविस्तर माहिती.

– डिजिटल पुरावा मधून या प्रकरणाशी संबंधित असलेल्या आणि सीडीआर मधून या प्रकरणाशी कुणाकुणाशी संपर्क झाला हे देखील सत्य समोर येऊ शकते.

# गाळमुक्त धरण योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा: आ.विजयसिंह पंडित

## जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गेवराईमध्ये चर्चासत्र

**गेवराई । प्रतिनिधी**

गाळमुक्त धरण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आ.विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून गेवराईमध्ये चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, जिल्हाधिकारी अविनाश पाठक व नाम फाऊंडेशनचे मराठवाडा समन्वयक राजाभाऊ



शेळके यांनी यावेळी मार्गदर्शन केले. मतदार संघातील नदी नाल्यांचे खोलीकरण, सरळीकरण व रुंदीकरण कामासह तलावातील गाळ काढण्याचा यामध्ये समावेश असून आता शेतकऱ्यांना गाळ घेवून जाण्यासाठी अवनी पच्या माध्यमातून प्रतीहेक्टरी १७ हजार रुपये अनुदान मिळणार आहे. त्यामुळे गाळमुक्त धरण योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन आ.विजयसिंह पंडित यांनी केले. गाळमुक्त धरण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी

▶▶ उर्वरित पान २ वर

# 'कृष्णा आंधळे इथे आहे, पैसे पाठवा घेऊन येतो'

## साडेचार तास वाट पाहायला लावून सुरेश धसांची फसवणूक

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामुळे जिल्ह्यासह संपूर्ण राज्याचे वातावरण ढवळून निघालं आहे. या प्रकरणातील इतर आरोपींना अटक करण्यात आली असली तर कृष्णा आंधळे हा अद्यापही फरार आहे.

पोलीस यंत्रणा त्याच्या शोधावर असून दोन महिन्यांपासून तो गायब आहे. भाजपचे आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण लावून धरलं असताना त्यांच्यासोबत



फसवणुकीचा प्रकार समोर आला आहे. फरार कृष्णा आंधळेला घेऊन येतो म्हणत एकाने सुरेश धस यांची पाच हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. मस्साजोगच्या ग्रामस्थांशी संवाद साधत असताना सुरेश धस यांनी या प्रकाराबाबत माहिती दिली.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात काही मागण्यांसाठी मस्साजोगच्या ग्रामस्थांनी दोन दिवस अन्नत्याग आंदोलन केले. पोलिसांच्या लेखी आश्वासनानंतर हे आंदोलन बुधवारी मागे घेण्यात आलं. यावेळी भाजपचे आमदार सुरेश धस हे देखील उपस्थित होते. गावकऱ्यांशी संवाद साधताना सुरेश धस यांनी फरार कृष्णा आंधळेच्या नावावर आपली

▶▶ उर्वरित पान २ वर

# शेतीपूरक ई-वाहनामुळे शेतकऱ्यांना होणार लाभ : पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

## महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर व कटरचा समावेश

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शासनाने आपल्या इलेक्ट्रिक वाहन धोरणात एक महत्त्वपूर्ण बदल केला आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी आता इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटरचा समावेश महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात केला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना शेती कामासाठी आवश्यक असलेल्या या ई वाहनांचा उपयोग करणे सोपे होणार आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकाराने हा महत्त्वाचा



निर्णय घेण्यात आला आहे.

इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि वातावरणातील प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण जाहीर केले होते. मात्र, सुरुवातीला या धोरणात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असलेल्या इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटरचा समावेश नव्हता. त्यावर विचार करून, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी या वाहनांचा समावेश धोरणात केला आहे. यासंबंधीच्या शासन निर्णयाचे शुद्धिपत्रक काढण्यात आले आहे.

शेतीकामांसाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केल्यास शेतकऱ्यांचा इंधनावरील खर्च कमी होईल आणि पर्यावरणावर होणारा नकारात्मक प्रभावही कमी होईल. ▶▶ उर्वरित पान २ वर

# पुत्रप्रेमापोटी तहसीलदार बापाने पुरवल्या कॉपी, बारावीच्या परीक्षेत रंगेहात पकडले

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगरमध्ये बारावीच्या परीक्षा केंद्रावर कॉपी पुरवल्याची घटना घडलीय. बारावीच्या विद्यार्थ्यांना कॉपी पुरवताना नायब तहसीलदाराला रंगेहाथ पकडण्यात आले आहे. ही घटना अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील परीक्षा केंद्रावर घडली आहे. या घटनेमुळे परीक्षा केंद्रावर एकच खळबळ उडाली. कॉपी पुरवतानाचा नायब तहसीलदाराचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. नायब तहसीलदाराचे नाव अनिल तोडमल आहे.



नायब तहसीलदार अनिल तोडमल यांचा मुलगा बारावीत आहे. सध्या बारावीची परीक्षा सुरु आहे. अशातच मुलाला मदत म्हणून नायब तहसीलदार पाथर्डीमधील बारावीच्या परीक्षा केंद्रावर पोहोचले. पेपर सुरु झाल्यानंतर त्यांनी मुलाला कॉपी देण्याचा प्रयत्न केला. परंतु, याचवेळी त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. तहसीलदार स्वत:च्याच मुलाला कॉपी पुरवत असल्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. पाथर्डी तालुक्यातील तनपूरवाडी या परीक्षा केंद्रावर ही घटना घडली असून या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी परीक्षा केंद्र गाठले. आता संबंधित नायब तहसीलदार अनिल तोडमल यांच्यावर ▶▶ उर्वरित पान २ वर




# 'निर्भया प्रकरणानंतर बदल झाला, पण...

## ' पुणे बलात्कार प्रकरणावर माजी सरन्यायाधीश चंद्रचूड यांचं परखड मत



**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील पुणे येथील स्वारगेट बसडेपोमध्ये एका शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाला. या प्रकरणात आरोपी दत्ता गाडेचा तपास सुरु आहे. देशभरातून या प्रकरणात तीव्र पडसाद उमटत आहेत. असं असताना भारताचे माजी मुख्य सरन्यायाधीक्ष डी. वाय.चंद्रचूड यांनी आपलं परखड मत व्यक्त केलं आहे. तसेच मोठी मागणी देखील केली आहे.

माजी मुख्य न्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांनी गुरुवारी सांगितले की, निर्भया घटनेनंतर कायद्यांमध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या, परंतु केवळ कायदे करून असे गुन्हे थांबवता येणार ▶▶ उर्वरित पान २ वर

# बाळासाहेब आजबे आपण मागील पाच वर्ष झोपा काढल्या का ?

**बीड । प्रतिनिधी**

भाजप आमदार सुरेश धस यांनी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये मोठ्या प्रमाणावर जमिनी लाटण्याचा आरोप करणारी पत्रकार परिषद राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी घेतली. सुरेश धसांवर गंभीर आरोप त्यांनी केलेत




मनोज जारंगेंना धोका दिला, ते महायुतीमध्ये असताना आमची काम अडवतात, आष्टीकरांची काम अडवतात त्यामुळे विकास कामाला अडथळा निर्माण झाला. त्याचबरोबर ज्या वाल्मीक कराडच्या विरोधात आज सुरेश धस बोलत आहेत त्याच वाल्मीक करडांनी सुरेश धसांचे काम केलं असल्याचं बाळासाहेब आजबे म्हणाले. मागील विधानसभा काळातील पाच वर्षांमध्ये २०१९ ते २०२४ आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार म्हणून कार्यरत असणारे हेच बाळासाहेब आजबे होते त्या पाच वर्षांमध्ये बाळासाहेब आजबे यांनी नेमके काय दिवे लावले? याची पत्रकार परिषद अगोदर बाळासाहेब

▶▶ उर्वरित पान २ वर

# शोरूममध्ये कोयता घेऊन तो मालकाच्या दिशेने चालून गेला अन्...

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या धारूर शहरात पुन्हा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हातात कोयता घेऊन शोरूम मालकाला मारण्याच्या उद्देशाने आलेला एक जण सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे. त्याने कोयता शोरूमच्या काचेच्या दरवाजावर मारल्याने दरवाजा फुटला. हल्लेखोराला वेळीच रोखल्याने मोठा अनर्थ टळला. या संदर्भात शोरूम मालकाच्या तक्रारीवरून आरोपी अनिल भगवान चाटे याच्या विरोधात धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# राष्ट्रीय विज्ञान दिन: वैज्ञानिक दृष्टिकोनाचा सन्मान




राष्ट्रीय विज्ञान दिवस हा भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो . २८ फेब्रुवारी १९२८ रोजी भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकट रमण यांनी रमण प्रभाव महत्त्वपूर्ण शास्त्रीय शोधाची घोषणा केली . या शोधामुळे त्यांना १९३० साली नोबेल पारितोषिक प्राप्त झाले . त्यांचा हा शोध भौतिकशास्त्राच्या क्षेत्रात एक ऐतिहासिक टप्पा ठरला आणि त्यामुळे भारताला शास्त्रज्ञांच्या पंक्तीत महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले . यादृष्टीने , २८ फेब्रुवारी हा दिवस विज्ञानाच्या क्षेत्रात केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याची आणि संशोधनाची साक्ष देणारा एक महत्त्वाचा दिवस म्हणून घोषित करण्यात आला आहे .

विज्ञानाचा इतिहास आणि महत्त्व : – विज्ञानाच्या शोधांनी मानवतेच्या प्रगतीसाठी अनंत मार्ग खुले केले आहेत . भूतकाळात विज्ञानाची त्याच प्रमाणेच आजच्या काळात देखील महत्वपूर्ण भूमिका आहे . प्राचीन काळातील ॲरिस्टॉटलपासून सुरू होणारे वैज्ञानिक विचार आणि यांत्रिक सुधारणांपासून सुरू झालेला विज्ञानाचा इतिहास आज इतक्या मोठ्या पातळीवर पोहोचला आहे की , तो आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे . विज्ञानाच्या सहाय्याने मानवाने अंतराळातील गूढ सोडविले, औषधांच्या शोधाने हजारो जीवनांचे रक्षण केले , आणि आजही आपण विज्ञानाच्या सहाय्याने वेगवेगळ्या वैश्विक सम स्यांवर मात करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. विशिष्टं ज्ञानम् विज्ञानम् ' अशी विज्ञानाची व्याख्या भारतात करण्यात आली होती . कौटिलीय अर्थशास्त्रात चौलकर्म म्हणजेच मुलाचे जावळ केल्यावर त्याला लिपी व संख्या शिकवायला सरुवात करावी , असे म्हटलेले आहे . छांदोग्य उपनिषदातील सातव्या अध्यायात , अध्यायाच्या सुरवातीलाच विज्ञानाने अनेक विषयांचे आकलन होते , म्हणून विज्ञानाचा अभ्यास करावा असे सांगताना ऋग्वेद , यजुर्वेद , सामवेद , अथर्ववेद , इतिहास , पुराणं यांच्याबरोबर नक्षत्रविद्या , भूतविद्या , तृण–वनस्पती विद्या , सर्पविद्या , श्वापदविद्या , कीटकविद्या अशा अनेक विषयांची यादी आहे . आज ज्याप्रमाणे विषयांचे वर्गीकरण केले जाते , तसे पूर्वी नव्हते . त्यामुळेच आयुर्वेदाचार्याला वनस्पतीशास्त्राबरोबरच प्राणिशास्त्र व रसायनशास्त्रासारख्या आयुर्वेदाला सहायकारी विषयांची सखोल माहिती असणे गरजेचे होते . आधुनिक काळात विज्ञान विषयाचे ढोबळमानाने चार प्रकारात वर्गीकरण केले जाते . त्यानुसार गणित – तर्कशास्त्र , भौतिक विज्ञान – ( याअंतर्गत पाच विषय येतात : खगोलशास्त्र, रसायनशास्त्र , भूगर्भशास्त्र , हवाम ानशास्त्र व भौतिकशास्त्र ) जीवशास्त्र – शरीरशास्त्र व इंद्रिय विज्ञान , सामाजिक विज्ञान – मानववंशशास्त्र , अर्थशास्त्र , राज्यशास्त्र , मानसशास्त्र , समाजशास्त्र हे विषय येतात . यातील गणित–तर्कशास्त्र हा विज्ञानाला सहायकारी असा विषय मानला जातो . तर सामाजिक विज्ञान हे आधुनिक विज्ञानाच्या भाषेत विज्ञान मानले जात नाही . या पार्श्वभूमीवर भौतिक विज्ञान व जीवशास्त्र हे दोन विषय विज्ञानाचे म्हणून उरतात . यातील जीवशास्त्र किंवा आयुर्वेदातील भारताची प्रगती सर्वश्रुत आहे . आपण येथे केवळ गणित व भौतिकशास्त्रांतर्गत रसायन या दोनच शाखांचा विचार करणार आहोत. रसायनशास्त्र : – इसवीसन पूर्व तीन ते चार हजार वर्षांपूर्वीपासून रसायनशास्त्रातील प्रगतीचे संदर्भ सापडतात . आयुर्वेदाचे एक अंग म्हणून त्याचा विकास झाला . चरक , सुश्रुत , वाग्भट , नागार्जुन हे सारे आयुर्वेदज्ञ रसायनशास्त्रातील तज्ज्ञ होते . रसरत्नाकर , चक्रदत्त , सिद्धयोग , रसार्णव , रसहृदय , रसेन्द्रचुडामणी , रसप्रकाश अशी रसशास्त्रावरील प्राचीन ग्रंथांची फार मोठी यादी आहे . आयुर्वेदात वेगवेगळ्या धातूंच्या पावडरींचा उपयोग होत होता . इसपूर्व पाचव्या शतकातील उत्खननात काचेच्या वस्तू सापडल्या आहेत . या काचेचे पृथक्करण केले असता त्यात सिलिकेट , अलुमिना , मॅंग्निशियम , अल्कली , फेरिक ऑक्साइड इत्यादी घटक मिळाले . सिंधू संस्कृतीत झालेल्या उत्खननात सोने , चांदी , तांबे , शिसे , कास्य , शिलाजीत , गेरू , शंख असे विविध पदार्थ उपलब्ध झाले . याशिवाय आयुर्वेदात पाऱ्याचा उपयोग फार मोठ्या प्रमाणात होत होता . संस्कृतम ध्ये पाऱ्याला 'रस' असेही म्हटले जाते . साधारणपणे तेराव्या शतकातील 'रसरत्नसमुच्चय' या ग्रंथात 'रसनात्सर्वधातूनां रस इत्यभिदियते।' रस ऊर्फ पारा सर्व धातूंचे रसन म्हणजे भक्षण करतो म्हणून त्याला 'रस' म्हणतात , असे सांगितले आहे . इसवी सन तिसऱ्या शतकातील कौटिलीय अर्थशास्त्रात अध्यक्षीय प्रचार नावाचे अधिकरण आहे . यातील १२ ते १४ हे अध्याय भारतीयांची धातुशास्त्रातील प्रगती दर्शवितात . यातील १२ वा अध्याय हा खाणी व कारखाने सुरू करण्याविषयी आहे . यात सुरुवातीलाच ' आकर ' म्हणजे खाणीच्या अध्यक्षाला शुल्बशास्त्र , धातुशास्त्र , रसपाक , मणिराग या विषयांचे ज्ञान असले पाहिजे असे म्हटले आहे . शुल्बशास्त्राला विविध अर्थ आहेत . रसरूपातील धातू आटवणे व शुद्ध करणे म्हणजे '' रसपाक ' होय . १३ वा अध्याय सोन्यावर प्रक्रिया करण्याविषयी आहे . यात सोन्याचे दागिने करताना क्षेपण , गुण आणि क्षुद्रक असे तीन प्रकार सांगितले आहेत . क्षेपण म्हणजे सोन्यात रत्ने बसवणे , गुण म्हणजे सोन्याच्या तारांची साखळी करणे व क्षुद्रक याचा अर्थ भरीव किंवा पोकळ सुवर्णम ण्यांनी युक्त दागिने घडवणे असा आहे . खाणींचे महत्त्व सांगताना कौटिल्य म्हणतो , ' खाणींमुळेच कोशाची उत्पत्ती होते , कोशामुळे सन्य उभारले जाते आणि कोश व सन्य यांच्या बळावरच राष्ट्र चालते म्हणून खाणीची काळजी राजाने घ्यावी .'भारतीयांचे रस – तंत्रज्ञान किती प्रगत होते , याचे उत्तम उदाहरण म्हणजे दिल्ली येथील मेहरौली गावातील लोहस्तंभ . हा स्तंभ इस ४०० मध्ये विक्रमादित्याने हुणांवरील विजयाचे प्रतीक म्हणून मथुरेला उभारला . पुढे अनंगपालाने तो दिल्लीला नेला . तिथे एकूण २७ मंदिरे होती . कुतुबुद्दीन ऐबकाने ती मंदिरं उद्ध्वस्त केली . पण हा स्तंभ त्याला उद्ध्वस्त करता आला नाही . जमिनीवर याची उंची ६.७ मीटर तर जमि नीखाली ०.५ मीटर व वजन सहा टन आहे . या स्तंभाचा विशेष म्हणजे आज इतकी वर्षे होऊनही हा लोखंडाचा स्तंभ गंजलेला नाही . भारतीयांची रसायानशास्त्रातील प्रगती भारताबाहेरील जगतातदेखील कौतुकाचा विषय होती . त्यामुळेच इ.स. ६३३ मध्ये खलिदच्या सन्यातील मुजाने ,' अत्यंत लवचिक अशा या भारतीय तलवारी आहेत ,' अशा शब्दांत भारतातील तलवारींचे कौतुक केले होते . म्हैसूर प्रांतात पूर्वी पोलाद निर्मिती होत असे जे परदेशात विकले जाई व त्यापासून बनलेल्या तलवारी 'दमास्कस तलवारी' या नावाने प्रसिद्ध होत्या . गणित : – वेदकाळात निरनिराळ्या आकारांच्या यज्ञवेदी असत . यज्ञकर्मात जराशी जरी चूक झाली तरी यज्ञफल मिळणार नाही , याची खात्री असल्यामुळे त्याच्या प्रत्येक कोनाचे अचूक मोजमाप घेतले जाई . शुल्ब याचा अर्थ दोरी . दोरीने मोजमापे घेऊन यज्ञवेदी निर्माण केल्या जात , म्हणून त्यांना शुल्बसूत्र असे म्हटले आहे . ख्रिस्तसनापूर्वी अंकगणित , ज्योतिर्गणित , रेखागणित , त्रिकोणमिती अशा गणिताच्या वेगवेगळ्या शाखांचा विकास झाला होता . गणिताविषयी ग्रीकांचे दहाचा चौथा व रोमनांचे १० चा तिसरा घात इतके ज्ञान असताना भारतात मात्र १०च्या १८ व्या घातापर्यंत मजल गेली होती . स्थानमहात्म्याने अंक वापरण्याची पद्धत भारतात इ. स. पूर्व तिसऱ्या शतकापासून होती . फार प्राचीन काळापासून बेरीज , वजाबाकी , गुणाकार , भागाकार , वर्ग , वर्गमूळ , घन , घनमूळ , या अंकगणितातील प्रमुख आठ क्रिया सापडतात . सातव्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चात्त्य देशात प्रसिद्ध असलेला पास्कल ट्रँगल ' मेरूप्रस्तर ' या नावाने प्रसिद्ध होता .

**–चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके ,**
**तहसीलदार , बीड**

## पान 1 वरून पुढे...

### गाळमुक्त धरण...

आ.विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून गुरुवार, दि.२७ रोजी दुपारी र.भ.अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्रात जय भवानी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, नाम फाऊंडेशनचे मराठवाडा समन्वयक राजाभाऊ शेळके यांच्यासह आदींनी मार्गदर्शन केले. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, तहसिलदार संदिप खोमणे, गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे, जि.प. लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता हेमंत पिंपळगावकर, बीड पाटबंधारे विभागाचे उपअभियंता विशाल हात्ते, जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता नखाते, जिल्हा जलसंधारण अधिकारी ठोंबरे, जि.प.लघु पाटबंधारे उपविभागीय अभियंता आर.डी.पठाण यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी संपुर्ण योजनेचा आढावा घेवून आराखडा अंतिम मंजुरीसाठी सादर करण्याच्या सूचना दिल्या. गेवराई शहरालगतच्या विद्रुपा नदीवरील शहरातील कचरा मोठ्या प्रम ाणावर टाकल्यामुळे नदीचे पात्र अरुंद झाले होते. महापुर परिस्थितीत या नदीचे पाणी शहरातील नागरीकांच्या घरात गेल्यामुळे नदीकाठच्या नागरीकांचे मोठे नुकसान झाले या पार्श्वभुमीवर आ.विजयसिंह पंडित यांनी विद्रुपा नदी गाळमुक्त करण्यासाठी त्याचे खोलीकरण, सरळीकरण व रुंदीकरणाचे काम या योजनेत समाविष्ट केलेले आहे. विद्रुपा नदीबरोबरच गेवराई तालुक्यातील अमृता नदीचा समावेश सुध्दा या योजनेत करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या या महत्वाकांक्षी योजनेत नाम फाऊंडेशन आणि टाटा मोटार्स यांचाही मोठा सहभाग असणार आहे. या योजनेसाठी अवनी पची निर्मिती केली असून योजनेच्या माध्यमातून निघणारा गाळ घेवून जाण्यासाठी शेतकऱ्यांना प्रतीहेक्टरी १७ हजार रुपये शासन अनुदान मिळणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदवून आपली शेती समृध्द करून घ्यावी असे आवाहन आ.विजयसिंह पंडित यांनी केले आहे. गाळमुक्त धरण योजना अधिक सक्षमपणे राबविण्यासाठी कृती आराखडा तयार करून अंतिम मान्यतेसाठी तातडीने पाठविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिल्या. जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्याच्यावतीने ठोंबरे यांनी या बाबतची माहिती दिली. चर्चासत्राला भवानी बँकेचे चेअरमन बप्पासाहेब मोटे, जय भवानी कारखान्याचे व्हा.चेअरमन भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, खरेदीविक्री संघाचे अध्यक्ष जयदिप औटी, उपसभापती विकास सानप, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, गेवराई तालुक्यातील संबंधित गावचे सरपंच, ग्रामसेवक, विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान 1 वरून पुढे...

### 'कृष्णा आंधळे इथे...

फसवणूक झाल्याचे सांगितले. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा तीन महिन्यांपासून फरार असून अद्याप त्याचा शोध लागलेला नाही. अशातच कृष्णा आंधळे याला घेऊन येतो असं सांगून एकाने सुरेश धस यांची पाच हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांचीही त्याच व्यक्तीने फसवणूक केल्याचं समोर आलं. बजरंग सोनवणे यांनाही या व्यक्तीने फोन करुन कृष्णा आंधळे हा छत्रपती संभाजीनगरमध्ये असल्याचे सांगितले होते. मात्र नंतर हा फसवणुकीचा प्रकार असल्याचे समोर आले. बापूराव बारगजे या व्यक्तीचा मलासुद्धा फोन आला होता. तो मला म्हणाला की कृष्णा आंधळे इथे आहे. त्याला कॅबमध्ये बसवून आणायचे आहेत पैसे पाठवा. मी त्याला पाच हजार रुपये पाठवले. मला त्याने साडेचार तास नगरला उभे केले. हॉनगरमधल्या हॉटेल यश पॅलेसला मी साडेचार तास वाट बघत बसलो पण तो आला नाही. त्याला पकडावं यासाठी मी आष्टीच्या पोलिसांना सोबत नेलं होतं. तो बारगजे नावाचा माणूस फ्रॉड निघाला. दोन–पाच रुपये कमावणाऱ्या या औलादी आहेत. मी पोलीस अधिक्षकांना फोन करुन याची माहिती दिली. अशा घटनांमधून दोन पाच रुपये कमावणाऱ्या व्यक्तीसुद्धा असू शकतात, असं सुरेश धस म्हणाले.

### शेतीपूरक ई-वाहनामुळे...

यामुळे वातावरणातील वायू प्रदूषणात घट होईल आणि शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या देखील फायदा होईल. याशिवाय, इलेक्ट्रिक वाहने जास्त वेळ चालतात, देखभाल खर्च कमी होतो आणि कमी इंधनाची आवश्यकता भासते. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणानुसार, बॅटरीवरील वाहनांची खरेदी करणाऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. या योजनेचा फायदा आता शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटर खरेदी करतांना होईल. राज्य सरकारने यासंबंधीचा शासन निर्णय जारी केला आहे. या धोरणामुळे फक्त शेतकऱ्यांना फायदे होणार नाहीत, तर पर्यावरण व वातावरणीय बदलाचा प्रभावही कमी होईल. इलेक्ट्रिक वाहने प्रदूषण कमी करण्यास मदत करतील, ज्यामुळे स्वच्छ हवा मि ळवता येईल. याशिवाय, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये इलेक्ट्रिक वाहने वापरण्याची आवड निर्माण होईल, जेणेकरून पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची स्वीकृती वाढेल. या धोरणामुळे महाराष्ट्र राज्यात शेतीच्या कामामध्येही इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढेल आणि शेतकऱ्यांना अधिक सुलभ आणि किफायतशीर साधने मिळतील, असे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

## पान 1 वरून पुढे...

### पुत्रप्रेमापोटी तहसीलदार...

आता काय कारवाई केली जाणार याकडे आता सर्वंचे लक्ष लागून राहिले आहे. राज्यभरात ४२ कॉपीच्या घटना– बारावीच्या परीक्षा सुरु झाल्यापासून अनेक ठिकाणी कॉपीच्या घटना घडताना दिसत आहेत. बारावी बोर्डाच्या परीक्षेच्या पहिल्याच दिवशी राज्यभरातून ४२ कॉपीच्या घटना समोर आल्या होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनाची गांभीर्याने दखल घेतली असून 'कॉपीमुक्त परीक्षा' उपक्रमाची अंम लबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण विभागासह इतर विभागही आता या प्रकरणी सरसावले आहेत. राज्यभरात ४२ पैकी २६ कॉपी प्रकरणे ही छत्रपती संभाजीनगर विभागातील आहेत. तर आठ प्रकरणे ही पुण्यातील आहेत. ज्यामध्ये ९ पैकी ६ विभागातील १९ परीक्षा केंद्रावर कॉपीच्या घटना घडल्या आहेत. तर कोकण, मुंबई आणि कोल्हापूर या विभागातील परीक्षा केंद्रांवर कोणत्याही कॉपीच्या घटना घडल्या नाहीत. अशी माहिती राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली आहे.

### बाळासाहेब आजबे...

आजबे यांनी घ्यावी.पाच वर्षापूर्वी सुरेश धस यांनी जमिनीचा घोटाळा केला हे का नाही सांगीतले? बाळासाहेब अजबे आष्टीवरून पाटोद्याला कधी गेला नसाल तर जा आणि मग तुमचे माकड हाड नाही दुखले तर पुन्हा सांगा. कारण त्यांनी उल्लेख केला की मी जरांगे यांना सांगितले होते की सुरेश धस तुमच्या आंदोलनाकडे आले तर अडचण होईल आणि तसेच झाले. बर असो आंदोलन सोडून महिना होत आहे तेव्हाच का नाही म्हणाले जरांगेला धसांनी धोका दिला म्हणून? जरांगे यांना सुरेश धस यांची भूमिका लक्षात आली आहे असे अजबे म्हणाले आहेत. मग मनोज जरंगे यांनीच आजबे यांना पत्रकार परिषद घ्यायला लावली असे समजायचे का? कारण जरंगे आणि आजबे यांची तळमळ एकसारखी आहे हे लक्षात आले आहे.

जर आपण असं समजलं की बाळासाहेब आजबे अजित पवार गटाचे नेते आहेत आणि ते धनंजय मुंडे यांची बाजू घेण्यासाठी सुरेश धस यांच्या विरोधात पत्रकार परिषद घेत आहे किंवा मग ते आष्टी मधल्या भ्रष्टाचाराबाबत पत्रकार परिषद घेत आहे मात्र मागील पाच वर्षात ही पत्रकार परिषद का घेतली नाही? हा एक सवाल आहे. आणि दुसरा मुद्दा ते वाल्मीक कराड आणि सुरेश धस हे एकच आहेत असं म्हणतात आणि असे म्हणणे हे वाल्मीक कराड यांच्या विरोधात आहेत आणि वाल्मीक कराड यांना विरोध म्हणजे धनंजय मुंडे यांना विरोध. त्यामुळें ही पत्रकार परिषद ना धनंजय मुंडे यांच्या फायद्याचे आहे ना अजित पवारांची आहे ना पक्षाच्या फायद्याची आहे. त्यामुळे ही पत्रकार परिषद केवळ त्रयस्थ कोणत्यातरी एखाद्या माणसाने घ्यायला लावलेली आहे ज्याचा सुरेश धसांचे खच्चीकरण झाल्यानंतर ज्यांना फायदा होईल ती दोन नावे समोर दिसतात ती म्हणजे पंकजा मुंडे आणि मनोज जरंगे या दोघांना फायद्या होणार आहे. बाळासाहेब आजबे यांनी सुरेश धस यांच्यावर जे आरोप केले आहेत त्याबद्दल चौकशी व्हावी सत्यता बाहेर यावी आणि राहिला विषय सरपंचाच्या ऑडिओ क्लिप चा तर तेव्हा धनंजय देशमुख यांचा खून झालेला नव्हता तेव्हा वाल्मीक कराड हे बाळासाहेब अजबे यांच्यासाठीही वाल्मीक आण्णाच होते है सगळ्या महाराष्ट्राला माहीत आहे त्यांनाही विसरता येणार नाही.

### 'निर्भया प्रकरणानंतर...

नाहीत. पुढे सरन्यायाधीश म्हणाले की, महिलांसाठी बनवलेले कायदे योग्यरित्या अंमलात आणले पाहिजेत. महिला जिथेही जातील तिथे त्यांना सुरक्षित वाटले पाहिजे. अशा प्रकरणांमध्ये योग्य चौकशी, कठोर कारवाई, जलद खटला आणि कठोर शिक्षा आवश्यक आहे. महिलांच्या सुरक्षेची जबाबदारी पोलीस आणि न्यायव्यवस्थेवरही त्यांनी भर दिला.

आरोपीवर बक्षीस जाहीर– विरोधी पक्षांनी या घटनेची तुलना २०१२ च्या दिल्ली निर्भया प्रकरणाशी केली आहे. ज्यामुळे सरकारवर दबाव वाढला आहे. पोलिसांनी ३७ वर्षीय आरोपी दत्तात्रेय रामदास गाडे याला अटक करण्यासाठी अनेक विशेष पथके तयार केली आहेत. पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले की, आरोपी कुठे आहे याची माहिती देणाऱ्या व्यक्तीला १ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाईल. गुन्हा कसा घडला?– स्वारगेट येथे असलेले महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे हे आगार शहरातील सर्वात मोठे बसस्थानक आहे. पीडितेने सांगितले की, मंगळवारी पहाटे ५.४५ वाजता, ती सातारा जिल्ह्यातील फलटणला जाण्यासाठी बसची वाट पाहत असताना, आरोपीने तिच्याशी गप्पा मारल्या, तिला दीदी असे म्हटले आणि सांगितले की तिची बस दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर उभी आहे. त्यानंतर आरोपी तिला एका रिकाम्या 'शिवशाही' एसी बसमध्ये घेऊन गेला जिथे लाईट बंद होते. सुरुवातीला, महिलेने संकोच केला, परंतु आरोपीने तिला खात्री दिली की, ही योग्य बस आहे. महिला बसमध्ये चढताच आरोपीने आत प्रवेश केला, दरवाजा बंद केला आणि तिच्यावर बलात्कार केला. घटनेनंतर आरोपी पळून गेला. तपास आणि पुढील कारवाई– सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत. एमएसआरटीसी प्रशासनाने सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. पीडितेच्या जबाबाच्या आधारे, तपास वेगाने सुरू आहे. या प्रकरणामुळे महिलांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होतात. गुन्हेगाराला लवकरात लवकर अटक करून जलद न्याय देण्यासाठी सरकार आणि पोलिस प्रशासनावर दबाव वाढत आहे.

## पान ४ वरून पुढे...

### शिवसेनेचा नाथ चषक...

मिळाला. नाथ चषक बीड प्रीमियर लीग २०२५ चा अंतिम सामना बीडच्या सिताई क्लब व सागर इलेव्हन मध्ये झाला. प्रथम फलंदाजी करत सागर एलेवेन संघाने सात षटकात ७६ धावा केल्या. अटीतटीच्या झालेल्या सामन्यात सिताई क्लबला जिंकण्यासाठी एका चेंडूत सहा धावा काढायच्या होत्या. परंतु जबरदस्त क्षेत्ररक्षण केल्याने सागर इलेव्हन ने सामना जिंकल्याचा जमा होता. हा सामना हातातून निसटत असताना सिताई क्लबच्या फलंदाजाने शेवटच्या बॉलवर षटकार मारून प्रतिष्ठेचा असणारा नाथ चषक जिंकत विजेतेपद पटकावले. तर सागर इलेव्हन संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. द्वारकाधीश क्रिकेट क्लब ने तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस तर मॉर्निंग क्रिकेट क्लब ने चौथ्या क्रमांकाचे बक्षीस मिळविले. सीपी मैदान येथे २७ फेब्रुवारी रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांच्या उपस्थितीत विजेत्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. यामध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या वतीने प्रथम पारितोषिक ५१ हजार व नाथ चषक, द्वितीय पारितोषिक ३१ हजार व चषक, तृतीय पारितोषिक ११००० व चषक, चौथे पारितोषिक ११००० व चषक देऊन संघांचा सन्मान करण्यात आला. अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा नाथ चषक प्रीमियम लीग च्या यशस्वी आयोजनामध्ये विवेक मोटे, अविनाश लंगडे, नवनाथ ढोले, संदीप काळे, संजय कुलथे, सुरेश राठोड, रंजीत काकडे, संतोष कुराडे, खदीर भाई, निलेश शेठ व संपूर्ण सीपी क्रिकेट क्लब चा समावेश होता. सदर स्पर्धा क्रीडा प्रेमींसाठी युट्युबच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली होती. दहा दिवस बीड शहरातील व तालुक्यातील क्रिकेट प्रेमींसाठी या स्पर्धा पर्वणी ठरली असल्याने यापुढेही दरवर्षी नाथ चषक बीड प्रीमियर लीगचे आयोजन करू असे शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.

### बाजार समित्यांच्या ...

मिळवुन द्यावी, बाजार समितीचे कार्यक्षेत्रात सा. स. २०२० – २१ मध्ये राज्य कापूस उत्पादक पणन महासंघामार्फत हमीदराने १ लाख ६२ हजार ६४.९५ क्विंटल कापुस खरेदी केलेला असुन प्रति शेकडा १/– प्रमाणे मार्केट फी रू. १ कोटी ४ लाख ७१ हजार ५५६ होते. सदरील फीसमधुन राज्य पणन मंडळ पुणे यांनी दि. महाराष्ट्र राज्य सहकारी कापुस उत्पादक पणन महासंघ विभागीय कार्यालय परळी वै. जि. बीड यांचेडुन २५ लक्ष अंशदान पोटी परस्पर वर्ग करून घेतले तर बाजार समितीस २४ लाख २६ हजार २६२ असे एकुण ४९ लाख २६ २६२ हंगाम २०२० – २०२१ मधील मार्केट फीस सी.सी.आय. दराप्रमाणे ०.५५ पैसे अदा केले परंतु उर्वरीत ०.५० पैसे प्रमाणे येणे रक्कम ५५ लाख ४५ हजार २९४ या बाजार समितीस दिलेले नाहीत. सदरील हंगामात जिल्ह्यातील इतर बाजार समितीच्या सीसीआयने खरेदी केलेल्या कापसावर मार्केट फीस प्रति शेकडा १/– प्रमाणे बाजार समितीस अदा केलेली आहे. त्याचप्रमाणे माजलगाव बाजार समितीसही रू. १/– प्रमाणे फीस मिळणे गरजेचे असुन संबंधित कार्यालयासोबत याबाबत बाजार समितीने पत्रव्यवहार केलेला आहे परंतु अद्यापपर्यंत उर्वरीत रक्कम येणे थकीत आहे. सदरील रक्कम देण्यासाठी संबंधीत कार्यालयास निर्देश द्यावेत, त्याचबरोबर कृषि उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्रात हमी दराने चना, तुर, सोयाबीन, मुग आदी शेतीमालाची खरेदी खाजगी निवीष्ठा यांना देण्यात आलेली आहे. या खाजगी निवीष्ठा या बाजार समितीशी कसलाही संबंध न ठेवता खरेदी करतात, यामध्ये मोठ्या प्रमाणात शेतक–यांची लुट होण्याची शक्यता नाकारता येत नाही व अशा खरेदीमुळे बाजार समित्या मार्केट फी पासुन वंचित राहत आहे. राज्य कृषि पणन मंडळाने विकसन कामासाठी व टीएमसी प्रकल्पासाठी माजलगाव बाजार समितीस दिलेल्या कर्जाच्या व्याजामध्ये शंभर टक्के व्याज सवलत देण्याची मागणी देखील करण्यात आली. निवेदनावर बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे यांची स्वाक्षरी आहे. यावेळी उपसभापती श्रीहरी नाना मोरे, सचिव एच. एन. सवणे, संचालक अमोल जाधव, भगवान आगे, नंदकिशोर सजगणे, प्रभाकर होके, वडवणीचे सभापती संभाजी शिंदे यांचेसह संचालक मंडळाची उपस्थिती होती.

### बालरोग तज्ञ परिचारिका' ....

बजावणाऱ्या बालरोगतज्ञ परिचारिका मुंबईनंतर आता मुंबईपेक्षा जास्त संख्येने बीडमधून घडणार आहेत. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी पालकमंत्री, आरोग्यमंत्री व महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आहेत.

केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून कुटुंब कल्याण कार्यक्रम ांतर्गत माता व बाळ मृत्यू दार कमी करण्यासाठी तसेच नवजात बालक व माता यांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी समुपदेशन, उपचार व प्रशिक्षण यांच्या माध्यमातून प्रशिक्षित अधिपरिचारिकांकडून आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. सध्या महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत २० विध्यार्थी क्षमता असलेला 'पोस्ट बेसिक डिप्लोमा इन पेडियाट्रिक नर्सिंग' हा अभ्यासक्रम केवळ मुंबई येथील जे.जे.रुग्णालय येथील परिचर्या प्रक्षिशण केंद्रात उपलब्ध होता. त्यानंतर आता जे.जे.रुग्णायलय येथील प्रशिक्षण केंद्रापेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश क्षमतेने या अभ्यासक्रमाला बीड जिल्हा रुग्णालयाच्या परिचर्या प्रशिक्षण केंद्रात सुरू करण्यासाठी मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्रात मुंबई नंतर बीड मध्ये बालरोगतज्ञ असलेल्या अधीपरिचारिका घडणार हि नक्कीच बीड जिल्ह्यासाठी भूषणावह बाब आहे. दरम्यान हा अभ्यासक्रम १ वर्ष कालावधीचा असून ३० विद्यार्थी प्रतिवर्षी येथे प्रवेश घेऊ शकतील. तसेच या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता जीएनएम किंवा बीएस्सी नर्सिंग उत्तीर्ण नोंदणीकृत अधिपरिचारिक असणे आवश्यक आहे. याबाबत दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून शासन निर्णय क्रमांक २०२५०२२७१४४४१३३१७ द्वारे अधिसूचित करण्यात आले आहे. बालरोग तज्ञ अधिपरिचारिका अभ्यासक्रमाला बीड जिल्हा रुग्णालयातील परिचर्या प्रशिक्षण केंद्रात मान्यता मिळावी यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्याला आता अखेर यश आले आहे. बीड मतदार संघाच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी पालकमंत्री ना.अजित दादा पवार, आरोग्यमंत्री प्रकाशराव आबिटकर यांचे व महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# श्री.सोमेश्वर संस्थान महाशिवरात्र महोत्सव!

## सोहळ्याची ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली मंझरीकर महाराजांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता

**बीड । प्रतिनिधी**

बीड सोमेश्वर महादेव मंदिर बार्शी रोड बीड येथील श्री सोमेश्वर विश्वत संस्थान मार्फत महाशिवरात्र महोत्सव प्रित्यर्थ दरवर्षी प्रमाणे गुरुवार दि.२० फेब्रुवारी रोजी पासून ह.भ.प. गुरूवर्य महंत महादेव महाराज चाकरवाडीकर आणि सोमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण , महाशिवरात्री महोत्सव सोहळ्याची सांगता आज दि.२७ गुरुवार रोजी ह भ प माधव महाराज डाके काठेवाडी कर यांच्या शुभहस्ते कलश स्थापना आणि सर्व भाविक भक्तांच्या सहकार्याने ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली मंझरीकर महाराज यांच्या सुश्राव्य अमृततुल्य दहिहंडीच्या कार्यक्रमाने काल्याच्या किर्तनाने झाली.

*गाथा अभंग – तुझिये संगति । जाली आमुची निश्चिति ।।१।।*
*नाहीं देखिलें तें मळे । भोग सुखाचे सोहळे ।।ध्रु.।।*
*घरीं ताकाचें सरोवर । येथें नवनीताचे पूर ।।२।।*
*तुका म्हणे आतां । आम्ही न वजों दवडितां ।।३।।*

हे भगवंत तुझ्या संगतिमुळे अंतःकरन अगदी निश्चिंत झाले आहे. कसली काळजी राहिलेली नाही ।।१।। जे कधीही अनुभवले नव्हते, ते सुख आता आम्ही आनुभवले . घरात ताकाचे सरोवर आहे; तर येथे लोन्याचा पुर आला आहे. तुकाराम महाराज म्हणतात, आता जरी तू आम्हाला हकलुन लावलेस तरीदेखिल आम्ही येथून जाणार नाही. तुझ्याच सहवासात राहणार. भगवान श्रीकृष्णांनी अवतार घेतल्यापासून बालपणी केलेल्या विविध लीलांचे वर्णन त्याचप्रमाणे अवतार संपेपर्यंत जीवनप्रवासावर प्रबोधन केले. विश्वाचे मुळ भगवान परमात्मा असुन



हे विश्वची माझे घर या न्यायाने माणसाने वागायला हवे. भगवंताचे नामस्मरण करायला हवं.परमात्मा सर्व जगाचा मालक असुन उपाधी विरहित भगवान परमात्म्याच्या माध्यमातून विश्वाची निर्मिती झाली असा गोड संदेश त्यांच्या वाणीतुन भाविक भक्तांना संदेश देत मंत्रमुग्ध केले. यावेळी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अखंड हरिनाम सप्ताह कालावधीत वेगवेगळ्या विषयांवर खालिल नामांकित किर्तनकारांकडुन ह.भ.प.भाऊसाहेब बाळकृष्ण जोशी राजपिंपरीकर गेवराई., ह भ प दीपक महाराज मेटे केज, हभप विक्रम महाराज काळे आळंदीकर, हभप लक्ष्मण महाराज इंगळे निंघुरकर, महंत स्वामी योगीराज महाराज श्रीक्षेत्र रामगड, ह भ प एकनाथ महाराज पुजारी विठ्ठल मंदिर बीड, निशुल्क कीर्तनकार ह भ प रंधवे बापू महाराज( महाराष्ट्र राज्य



पुरस्कार सन्मानित गिनीज बुकात नोंद) पाटोदा. यांची किर्तनाद्वारे समाज प्रबोधन करत सेवा संपन्न झाली. पंचक्रोशितील विविध गावांतील मृदुंगाचार्य, वारकरी,भजनी मंडळ यांच्या द्वारे हरिजागर आणि प्रवचने भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन सोमेश्वर महादेव मंदिर संस्थान महाशिवरात्र उत्सव कमिटी बीड, विश्वस्त मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते. किर्तनानंतर हजारो भाविकांनी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

उपस्थिती ; संस्थानच्या विकासासाठी भरीव योगदान देण्याचे आश्वासन – सोमेश्वर महादेव मंदिर संस्थान महाशिवरात्र महोत्सव सांगता सोहळ्यात यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, हभप अरुण नाना डाके, अलकाताई डावकर, बाबुरावजी परळकर, पांडुरंग जानोळे, श्रीमती राजर्षी प्रदीप बाबरस, गोरख शिराळे,ड.गोविंद शिराळे, सदाशिव



शेजाळ, बाबासाहेब शिंदे, प्रधान पवार, श्रीहरी वाघमारे, दोडके सर, हरिदास जोगदंड ,महादेव आंधळकर, बाळू गलधर ,श्रीराम मुळे, बंडू कदम, आत्माराम शिराळे, वसंत कदम, विनोद अनिल परांडकर , अनिलनाना धांडे, दीपक दामू कदम , नागोराव काकडे, बप्पासाहेब घुगे, गोरख भाऊ गायकवाड , संस्थानच्या वतीने नवनाथ अण्णा शिराळे यांनी ह भ प ज्ञानेश्वर माऊली मांजरेकर यांचा व नवनाथ अण्णा शिराळे यांचा मराठवाडा पत्र संपादक दत्तात्रय नरनाळे यांनी शाल श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार केला. ट्रस्टचे अध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे यांनी सर्व महाराज व भाविकभक्तगण , वारकरी , टाळकरी, सेवक सर्वांची कृतज्ञता व्यक्त करत संस्थानच्या विकासासाठी भरीव योगदान आणण्यासाठी आपले प्रयत्न असतील असे म्हणाले.

# अबॅकस मास्टर जिनियस विरेन संजीव पिंपळे

**बीड । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील कोणत्याही जागतिक अबॅकस मॅथ ओलंपियाड चॅम्पियनशिप सर्व प्रकारच्या परीक्षांमध्ये भरभरून यश मिळवणारा एकमेव विद्यार्थी म्हणजेच विरेन संजीव पिंपळे होय. बालकांच्या विविध कलागुणांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने, सुप्तगुणांचा विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. देशामध्ये जापनीज किंवा अमेरिकन अबॅकस किंवा रशियन अबॅकस किंवा लंडन अबॅकस सर्वप्रचलित अबॅकस मध्ये अव्वल क्रमांक मिळवणारा आणि गणिताबद्दलची कोणतीही भीती नसणारा विद्यार्थी म्हणजेच विरेन संजीव पिंपळे होय. विरेन पिंपळेला अबॅकसची जास्त शिकवण असल्यामुळे त्याच्या शाळेमध्ये सुद्धा तो सतत प्रथम



क्रमांकाचा विद्यार्थी असून त्याने अबॅकसचा उपयोग विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास सातत्यपूर्ण अभ्यासातील क्षमता वाढवण्यासाठी होतो असे सांगितले आहे. अबॅकस आणि वैदिक मॅथ्स सारख्या पद्धतीमुळे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये मग ती जपान कॉम्पिटिशन किंवा कोणतीही वर्ल्ड चॅम्पियनशिप असो त्यामध्ये प्रथम क्रमांक जसे की दिल्ली येथील जागतिक अबॅकस स्पर्धा, कर्नाटक जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये झालेल्या जागतिक स्पर्धा, अबॅकस सेंटर मधील लेवल मधील स्पर्धा यामध्ये त्याने गोल्ड मेडल प्रशस्तीपत्र आणि कॅश प्राइजेस मिळवलेले असून प्रतिष्ठित व्यक्तींद्वारे त्याचा सत्कार करण्यात आलेला आहे.

# सरपंच बालासाहेब इंगोले यांनी विद्यार्थ्यांना दाखवला छावा चित्रपट

### विद्यार्थीनी घेतला चित्रपटाचा आनंद

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून धानोरा येथील सरपंच बालासाहेब आबा इंगोले यांनी आपण समाजाचे काही देणे लागतो या सद्भावनेने छत्रपती संभाजी महाराजांची यशोगाथा आणि जीवनपट जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्या करिता दिव्यांग विद्यार्थी ,महिला, ऊसतोड मजुरांची मुले, काही महिला यांना छावा चित्रपटच्या शोचे आयोजन गुरुवार दि. २७ रोजी दुपारी बीड येथील तनिष्क सिनेमा येथे करण्यात आले होते. हा चित्रपट पाहण्यासाठी प्रचंड गर्दी करण्यात आली होती. या वरवटी



आहेर धानोरा सरपंच बालासाहेब आबा इंगोले, सामाजिक कार्यकर्ते विनोद आप्पा इंगोले, ग्रामपंचायत सदस्य व शाळेतील शिक्षिका शिक्षक विद्यार्थी विद्यार्थिनी वृंद आदी उपस्थित होते.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यगाथेवर आधारित छावा चित्रपट जास्तीत जास्त लोकांनी पहावा आणि संभाजी महाराजांचा जीवनपट सर्वांना अनुभवता यावा या करिता या शोची आयोजन काण्यात आले होते. जास्तीत जास्त संख्येने महिला आणि विद्यार्थ्यांना हा चित्रपट पाहण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. दिव्यांग विद्यार्थी आणि ऊसतोड मुलांच्या पाल्यांना हा चित्रपट पाण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने हे विद्यार्थी समाधान व्यक्त करत होते. चित्रपट पाहतेवेळी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयघोषाने सिनेमागृह दणाणून गेले होते. हा शो आयोजित केल्या बद्दल तीनही शोसाठी उपस्थित असलेल्या प्रेक्षक महिला, विद्यार्थी यांनी सरपंच बालासाहेब आबा इंगोले विनोद आप्पा इंगोले यांचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

**याप्रसंगी बालासाहेब आबा इंगोले म्हणाले की सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना हा चित्रपट दाखवण्यासाठी प्रत्येक गावातील सरपंचांनी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनातील संघर्ष काय होता हे विद्यार्थ्यांना चित्रपटांच्या माध्यमातून ज्ञात होईल. व पुढील पिढी याचा अभ्यास करून चांगले पिढीकडे असे मत इंगोले यांनी व्यक्त केले.**

### मराठी राजभाषा गौरव दिन व स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी साजरी

बीड : संस्कार विद्यालय बीड येथील इयत्ता तिसरी चौथी विभागात आद्यकवी वि.वा. शिरवाडकर यांची जयंती तसेच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान महाशिवरात्र महोत्सव!

## सोहळ्याची ह.भ.प.लक्ष्मण मेंगडे महाराजांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान मार्फत महाशिवरात्र महोत्सव प्रित्यर्थ दरवर्षी प्रमाणे दि.२० गुरुवार रोजी पासून पासून गुरूवर्य महंत मठाधिपती महादेव भारती महाराज आणि मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण , महाशिवरात्री महोत्सव सोहळ्याची सांगता आज दि.२७ गुरुवार रोजी अध्यक्ष बंकटस्वामी संस्थान नेकनुर ह.भ.प.लक्ष्मण



महाराज मेंगडे यांच्या सुश्राव्य अमृततुल्य दहिहंडीच्या कार्यक्रमाने अर्थात काल्याच्या किर्तनाने झाली.भगवान श्रीकृष्णांनी अवतार घेतल्यापासून बालपणी केलेल्या विविध लीलांचे वर्णन त्याचप्रमाणे अवतार संपेपर्यंत जीवनप्रवासावर प्रबोधन केले. विश्वाचे मुळ भगवान परमात्मा असुन हे विश्वची माझे घर या न्यायाने माणसाने वागायला हवे.भगवंताचे नामस्मरण करायला हवं.परमात्मा सर्व जगाचा मालक असुन उपाधी विरहित भगवान परमात्म्याच्या माध्यमातून विश्वाची निर्मिती झाली असा गोड संदेश त्यांच्या वाणीतुन भाविक भक्तांना संदेश देत मंत्रमुग्ध केले. यावेळी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





*बजरंगबली प्रतिष्ठाण आयोजित शिवजन्मोत्सव सोहळा–२०२५ चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळामंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी रामचंद्र संस्थान चे मठाधिपती रामानंद महाराज भारती, मा. श्री. चंद्रकांत शेळके साहेब (तहसीलदार बीड), मा.श्री. शिवाजी बंटेवाड साहेब (पोलीस निरीक्षक – बीड ग्रामीण) मा.श्री. समंदर खान साहेब (गटशिक्षणाधिकारी. पं.स. बीड, बजरंगबली प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष किरण भगत, मा.श्री. गणेश बहिर सर (केंद्र प्रमुख राजुरी नवगण) व सर्व जिल्हा परिषद शिक्षक, ग्रामस्थ व तिप्पटवाडी, मुर्शदपुर, रूईलिंबा, लिंबारूई शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थित पार पडला*

# मराठा समाजाच्या नावावर दलाली करणार्यांनो बाळराजे दादा आवारे यांचा आदर्श घ्या ; आण्णासाहेब जाधव

**बीड । प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारका पासुन वंचित राहिलेल्या चौकात आज स्मारक बसवून कुठला गाजा वाजा न करता कुठली प्रसिद्धी न मिळवता स्वतः च्या खर्चाने मागेल त्याला शिवस्मारक देऊन एक आदर्श व्यक्तिमत्व कसे असावे याचे उत्तम उदाहरण म्हणजे धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष



आदरणीय बाळराजे दादा आवारे

पाटील हे आहेत त्यांनी आज बीड जिल्हात धारूर चौक, केज चौक व आनंदगाव, कवडगाव हुडा , बोरखेड, तेलसमुख,मोठेवाडी तसेच लातुर जिल्ह्यातील औसा या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवस्मारक ऊभारले व अंबेजोगाई येथे छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक बसवले तरी हा माणूस आजही जमिनीवर वावरत आहे जे मराठा समाजातील दलाली करणार्या नेत्यांना, समन्वयक यांना जमले नाही ते शिवश्री बाळराजे दादा आवारे पाटील यांनी करून दाखवले व त्यांचा माणस आहे जास्तीत जास्त शिवस्मारक उभा करण्यासाठी योगदान देण्याचा ऐवढे करत असताना व स्वताच्या खिशातले लाखो रुपये खर्चून आज छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, यांचे स्मारक ऊभारत आहे पण कोणी नाव घ्यावे किंवा द्यावे हि सुद्धा अपेक्षा न ठेवता शिवस्मारक साठी लढणारा व्यक्ती मि आज पहिल्यांदाच पाहत आहे .


## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एस.पी. वानखडे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६८/२०२५,**
**उर्मिला लक्ष्मण कादे वगैरे विरुद्ध निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **लक्ष्मण पि. उत्तम कादे हे / हया दिनांक १८/०१/२०२५ रोजी रा. खेर्डावाडी ता. गेवराई जि. बीड, येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १. उर्मिला लक्ष्मण कादे वय – ६२ वर्षे, धंदा– शेती,खेर्डावाडी ता. गेवराई जि. बीड २. हरिकृष्ण पि लक्ष्मण कादे वयः ४२ वर्षे, धंदा शेती, खेर्डावाडी ता. गेवराई जि. बीड.** शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता, करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाने प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणा म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर सदर अर्जदारांच्य होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत **लक्ष्मण पि. उत्तम कादे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २५/०२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख २८/०३/२०२५

**(मार्फत ॲड. एस. एल. मेघारे गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एस. पी. वानखडे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५५१ / २०२४**
**अनिल दामोधर घोडके व इतर विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे दामोधर पि. अर्जुन घोडके हे / हया दिनांक २६/०९/२००८ रोजी मौजे उमापुर, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार १. अनिल पि दामोधर घोडके, वय – ५२ वर्षे, धंदा–शेती, रा. उमापुर, ता. गेवराई, जि. बीड, २. संभाजी पि. दामोधर घोडके, वय – ४८ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर, ३. काविरा भ्र. सुनिल घोडके, वय–४५ वर्षे, धंदा–घरकाम व शेती, रा. सदर, ४. ऋषिकेश पि. सुनिल घोडके, वय–२३ वर्षे, धंदा–शिक्षण, रा. सदर, ५. हरिओम पि. सुनिल घोडके, वय–२० वर्षे, धंदा–शिक्षण, रा. सदर, ६. मिरा भ्र. संदीप औटे, वय– ३० वर्षे, धंदा–घरकाम, रा. नवगांव ता. पैठण जि. छ. संभाजीनगर, ७. भाग्यश्री भ्र. संदीप राऊत, वय–२५ वर्षे, धंदा–घरकाम, रा. कुंभार गल्ली जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर यांना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हज होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर न्यायालय सदर अर्जदारान्या सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत दामोधर पि. अर्जुन घोडके यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०/१२ /२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख १५/०१/२०२५

**(मार्फत ॲड. एस. एल. मेघारे, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

# माऊली दादांनी महाराष्ट्राला नम्रतेची शिकवण दिली ; लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र चाकरवाडी मध्ये महाशिवरात्रीनिमित्त अखिल भारतीय वारकरी संमेलन तसेच दोन दिवसीय महोत्सव सुरू आहे.प्रमुख मार्गदर्शक तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री ह.भ. प महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली महाशिवरात्री महोत्सव निमीत्त होणारे सर्व कार्यक्रम पार पडतील. या महोत्सवामध्ये विसाव्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांच्या पवित्र पावन भूमीमध्ये महाशिवरात्री महोत्सवानिमित्त पहिल्या दिवशी वारकरी संप्रदायातील कीर्तन परंपरेतील एक थोर विभूती मठाधिपती महंत श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे श्री बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र निनगुर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. ह. भ. प लक्ष्मण महाराज



मेंगडे यांनी जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या गाथा मधील अभंगावर चिंतन केलेत.

*तुम्ही विश्वनाथ । दीनरंक मी अनाथ ।।१।।*
*कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी ।।ध्रु.।।*
*काय उणें तुम्हांपाशीं। मी तों अल्प चि संतोषी ।।२।।*
*तुका म्हणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ।।३।।*

हे देवा तुम्ही विश्वनाथ आहात आणि मी तर दिन रंक अनाथ आहे. हे विश्वनाथ मी तुमचा भक्त आहे तुम्ही थोडी का होईना पण माझ्यावर दया करा. देवा तुमच्याजवळ भक्तांना देण्यासाठी काय उणे आहे आणि मी तर अल्प संतोषी आहे. तुकाराम महाराज म्हणतात हे देवा मला तुम्ही काहीतरी प्रेमरूपी भातुके म्हणजे खाऊ पाठवा.

महाराजांनी आपल्या कीर्तन श्रावणेतून भाविकांना मंत्रमुग्ध केले. अशाप्रकारे महाराजांनी आपल्या अभंगातून भाविकांना संदेश दिला. अभंगावर चिंतन करून हरिहराचे दर्शन करून नाथाचे प्रकार कोणते आहे ? कृपेचे प्रकार किती ? अति महत्त्वाकांक्षामुळे भस्मासुराचा भस्म कसा झाला... महाशिवरात्री व शिव-पर्वामुळे चंड भिल्लाचा उद्धार कसा झाला. बोलताना महाराजांनी माऊली दादांनी महाराष्ट्राला नम्रतेची शिकवण दिली अशा प्रकारचे प्रतिपादन सुद्धा केले. माऊली दादा एक शिवाचे अवतार आहेत. माऊली दादा आणि सुदाम देव बाबा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यावेळी मृदुंगाचार्य नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्थेचे राम महाराज काजळे, अमोल महाराज पवार चाकरवाडीकर, गायनाचार्य बिबीशन महाराज कोकाटे, गायनाचार्य श्रीहरीभाऊ महाराज काळे, गायनाचार्य महादेव महाराज रोडे, त्रिंबक महाराज शेळके, अमोल महाराज पवार, दिनेश महाराज काळे, राम महाराज गायकवाड, पांडुरंग महाराज शिंदे, श्रीनिवास महाराज खोसे, तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त नादब्रम्ह वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी उपस्थीत होते.

# शिवसेनेचा नाथ चषक सिताई क्लब च्या नावे तर सागर इलेव्हन संघ ठरला उपविजेता

## बीडमध्ये दरवर्षी नाथ चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करणार : सचिन मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या पुढाकारातून आयोजित नाथ चषक बीड प्रीमियर लीग' मध्ये बीडच्या सिताई क्लब संघाने धडाकेबाज फलंदाजी करत प्रतिष्ठेचा समजला जाणारा नाथ चषक जिंकत विजेतेपद पटकावले तर सागर एलेवेन संघाने उपविजेतेपद पटकावले. बक्षीस वितरण कार्यक्रमात शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन मुळूक यांनी दरवर्षी बीडमध्ये नाथ चषक प्रीमियर लीग चे आयोजन करणार असल्याचे सांगितले.



शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने बीडमध्ये प्रथमच नाथ चषक बीड प्रीमियर लीग या भव्य क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले होते. शिवजयंती दिनी १९ फेब्रुवारी रोजी सीपी मैदान पालवन चौक येथे स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर आदी उपस्थित होते. १९ ते २७ फेब्रुवारी दरम्यान सी पी मैदान येथे झालेल्या नाथ चषक प्रीमियम लीग क्रिकेट स्पर्धेला बीड शहर व तालुका भरातून उत्स्फूर्त प्रतिसाद

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: वसंतराव नाईक अधिकारी, कर्मचारी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी अर्जुन चव्हाण उपाध्यक्षपदी राजेशकुमार राठोड, बी. टी. पवार, सचिवपदी आबासाहेब राठोड, सहसचिवपदी विजय चव्हाण, कार्याध्यक्षपदी जगन्नाथ चव्हाण यांची निवड करण्यात आली.*

# पवित्र रमजान महिन्यात बीड शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा, स्ट्रीट लाईट, रस्त्याचे खड्डे तात्काळ बुजवावेत- शेख अझहर यांची नगर परिषदेकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

मुस्लीम समाजाचा पवित्र रमजान महिना हा दि.०१/०३/२०२५ पासून सुरु होत असून पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासह शहर स्वच्छता व्यवस्थित ठेवावी अशी मागणी शेख अझहर, शेख अखिल, शेख अजीम, शेख अक्रम, कामरान खान यांनी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.



याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, गेल्या काही महिन्यांपासून बीड शहरात कुठे १५ दिवसाआड तर कुठे २५ दिवसाआड नळांना पाणी सोडले जाते. विद्युत पुरवठा कमी जास्त प्रमाणात वारंवार खंडित होतो. शहर स्वच्छतेची तर पूर्णतः वाताहात झाली आहे तसेच शहरात जागोजागी कचर्याचे ढिगारे दिसत असून तुंबलेल्या नाल्या देखील दोन-दोन महिने काढल्या जात नाहीत. तसेच शहरातील दाऊदपुरा, मोमीनपुरा या भागातील स्ट्रीट लाईट चालू नसून त्या स्ट्रीट लाईट तात्काळ चालू करण्यात याव्यात आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक - बशीरगंज-राजुरीवेस-कारंजा -जुना बाजार या रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात यावेत. येत्या ०४ दिवसांत रमजान महिना सुरु होणार असून मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने रमजानचे रोजे धरतात म्हणून रोजेदारांना पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा आणि स्वच्छता वेळच्या वेळी खंड न पडता मिळायलाच हवी. जर या सेवांमध्ये कुचराई करण्यात आली तर बीड नगर परिषदेच्या विरोधात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करु असा इशारा पत्रकातून दिला आहे.

# बाजार समित्यांच्या विवीध मागण्यांचे पणनमंत्र्यांना सभापती नरवडे, उपसभापती मोरे यांनी दिले निवेदन: राज्यस्तरीय पणन परिषदेत दिले निवेदन

**माजलगाव । प्रतिनिधी**

बाजार समितीच्या असलेल्या विवीध अडचणी व मागण्यांचे निवेदन पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा कृषि पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांना माजलगाव बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी पुणे येथे दि. २४ फ ब्रुवारीला कृषि उत्पन्न बाजार समि त्यांची राज्यस्तरीय पणन परिषदेत दिले.



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बाजार समित्यांच्या उत्पन्नातुन ०.५ टक्के अंशदान राज्य कृषि पणन मंडळास भरणा करावा लागतो परंतु अंशदान भरणा करूनही बाजार समित्यांना फायदा मिळत नाही. याचा विचार करून अंशदान आकारणी उत्पन्नावर न करता होणा-य वाढव्यावर करावी जेणेकरून समित्या सक्षम होण्यास मदत होईल. माजलगाव बाजार समितीने सा. सन २०१६ - १७ व सा. सन २०१७ - १८ या वर्षात शासकीय नाफेड/राज्य, सहकारी मार्केट फेडरेशन मार्फत तुर, चना खरेदी केली होती. यासाठी माजलगाव बाजार समितीने खरेदी केंद्रावर आवश्यक त्या सोयी, सुविधा, कर्मचारी वर्ग सुविधा पुरविल्या होत्या. याठिकाणी शेतमाल खरेदीवरील बाजार फी व इतर अनुषांगीक खर्चाची रक्कम ५१ लाख ९१ हजार ५९७ थकीत असुन सबंधित कार्यालयास बाजार समितीने पत्रव्यवहार करूनही फीस मिळालेली नाही. या फीस वसुलीसाठी पणन मंडळाकडुन कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही व सहकार्यही मिळालेले नाही. त्यामुळे सदरील फीस बाजार समितीस मिळावी यासाठी संबंधीत कार्यालयास निर्देश देवुन सदरील फीस ▶▶ उर्वरित पान २ वर

# बालरोग तज्ञ परिचारिका' अभ्यासक्रमाला जे.जे. हॉस्पिटलनंतर बीड जिल्हा रुग्णालयात मान्यता

## आ.संदीप क्षीरसागरांनी मानले शासनाचे आभार



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत २० विद्यार्थी प्रवेश क्षमता असेलला केवळ जे.जे. रुग्णायालय मुंबई येथे उपलब्ध असलेला नर्सिंग क्षेत्रातील 'पोस्ट बेसिक डिप्लोमा इन पेडियाट्रिक नर्सिंग' आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यामुळे ३० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचा अभ्यासक्रम आता बीड जिल्हा रुग्णायालात उपलब्ध होणार आहे. बीड जिल्हा रुग्णालयातील परिचर्या प्रशिक्षण केंद्रात हा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनाकडून मान्यता मिळाली आहे. त्यामुळे माता व नवजात बालक यांच्या आरोग्यसेवेत महत्वाची भूमिका

▶▶ उर्वरित पान २ वर

# आरणवाडी शिवारात बिबट्या दिसल्याची चर्चा ; परिसरात भीतीचे वातावरण

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

आरणवाडी शिवारात बिबट्या दिसल्याने चर्चा परिसरात एकच खळबळ उडाली आहे. धारुर तालुक्यातील आरणवाडी शिवारात बिबट्या दिसल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. यामुळे शेतकरी वर्गासह ग्रामस्थांत भिंतीचे वातावरण पसरले असून ग्रामस्थांनी याची माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीवर कळवली आहे.




तालुक्यातील आरणवाडी येथील शेतकरी उद्धव रुद्रे हे शेतात राहतात मंगळवारी यांच्या शेतात बिबटया शिकारीवर आला होता त्याच्या शेतातील गाईची बिबट्याने मंगळवारी रात्री शिकार केली. बुधवारी रात्री पुन्हा त्या शिकारीवर आला असता त्यांना बिबट्या दिसला. त्यांनी गावात फोन केले आरडाओरड केल्यानंतर गावातील नागरिकांनी शेताकडे धाव घेतली लोक येताच हा बिबट्या शेतातून पलिकडे पसार झाला.गावातील नागरिकांनी हा बिबट्या पाहिला असुन बिबट्या एक नसुन दोन बिबटे व तीन बिबट्याचे बछडे आहेत अशी माहिती गावकर्यांनी दिली. गावातील ग्रामस्थांनी बिबट्या आल्याची माहिती वन विभागाच्या अधिकार्यांना देण्यासाठी फोन केले असता वन विभागाच्या अधिकार्यांनी उचला नसल्याची माहिती आमच्या प्रतिनिधिंशी बोलताना ग्रामस्थांना दिली. परंतु आज सकाळी याची माहिती वन विभागाच्या अधिकार्यांन दिली असता वन विभागाची टिम गावात दाखल झाली आहे.

# महाशिवरात्रीनिमित्त राजा हरिश्चंद्र देवस्थान गजबजले

## हिंदुस्थानातील एकमेव मंदिर असल्याने लाखो भाविकांची गर्दी; फराळासाठी ३५ क्विंटल रताळे तर २५ क्विंटल साबुदाणा ची होती सोय

**वडवणी । प्रतिनिधी**

भारत देशातील एकमेव असलेले राजा हरिश्चंद्र देवस्थान वडवणी तालुक्यातील हरिश्चंद्र पिंपरी येथे आहे. या ठिकाणी महाशिवरात्री उत्सवानिमित्त गेल्या आठ दिवसापासून महोत्सव सुरू आहे. त्यातच काल महाशिवरात्रीनिमित्त लाखो भाविकांनी राजा हरिश्चंद्र देवस्थान येथे भेट देत दर्शन घेतले. यावेळी भाविकांना फराळासाठी ३५



क्विंटल रताळे व २५ क्विंटल साबुदाण्याची सोय करण्यात आली होती. आलेल्या सर्व भाविकांची गैरसोय न होता व्यवस्थित दर्शन व फराळाचे नियोजन मठाधिपती भगवान महाराज राजपूत यांच्या



मार्गदर्शनाखाली झाले. सत्यवादी, न्यायनिष्ठ राजा तसेच स्वप्नात राज्य दान देणारा दानशूर राजा म्हणून ख्याती असलेले राजा हरिश्चंद्राचे एकमेव मंदिर बीड जिल्ह्यातील वडवणी जवळील राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे आहे. या तिर्थस्थळावर संत भगवान बाबा यांनी महाशिवरात्र महोत्सवाची सुरुवात केली होती. त्यांचे उत्तराधिकारी संत भिमसिंह बाबा यांनी ही परंपरा आयुष्यभर चालवली. आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांच्या आधिपत्याखाली या तीर्थ स्थळाचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या नेतृत्वाखाली ही परंपरा चालू आहे. यावर्षी या ठिकाणी महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन केले होते. उद्या वार गुरुवार रोजी काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे. यावेळी आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन महंत भगवान बाबा राजपूत यांच्यासह परिसरातील राजा हरिश्चंद्र पिंपरी पंचक्रोशीतील गावकऱ्यांनी केली होती. महाशिवरात्री उत्सवानिमित्त भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी राजा हरिश्चंद्र पिंपरी आणि पंचक्रोशीतील शेकडो तरुण या ठिकाणी आपली कामे सोडून वाढ करण्यासाठी, स्वच्छता करण्यासाठी, तसेच आलेल्या भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी या ठिकाणी मेहनत घेतली या तरुणांच्या फौजेमुळे या ठिकाणी आलेल्या सर्व भाविकांचे दर्शन ही सुरळीत झाले.

